e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# पटकथा : एक गद्य लेखनाचा प्रकार

**प्रा.प्रकाश गंगाराम बावणे**[1]
संशोधक
मराठी विभाग मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा,
यवतमाळ

**डॉ. शिवाजी नीळकंठ** नागरे[2]
मार्गदर्शक,
मराठी विभाग प्रमुख, संशोधन केंद्र,
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
अकोला

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.48

पटकथा हा प्रकार भारतीय साहित्यासाठी व मराठी साहित्यासाठी नवीन नाही. प्राचीन वाङ्मयाचा इतिहास लक्षात घेता, साहित्यात जरी पटकथा ही संज्ञा अस्तित्वात नसली तरी पटकथा सदृश्य लेखन फार पूर्वीपासून होत आले आहे. पटकथा ही कथेवर आधारित असते. पटकथा ही संकल्पना समजून घेण्याआधी कथा ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. कथेला चित्रपटाच्या भाषेत 'वनलाइनर' म्हणतात. ही कथा सुचताच लेखकाच्या मनात पात्रे ठळक होतात. या पात्रांची पार्श्वभूमी ठरवणे, पात्रांची जडणघडण, विविध पात्रातील परस्पर संबंध यातून कथा आकारास येत असते. कथा हा एक गद्य लेखनाचा प्रकार आहे. लिखित साहित्य निर्माण होण्यापूर्वी कोणत्याही भाषेत. रम्य अशा कथा लोक परिसरात वाढतात. लोकरंजन करतात, हाडामासांनी पुष्ट होतात, लोककथा आणि लोकगीते यांच्या रुपात मौखिक परंपरेने प्रचलित असलेले साहित्य विद्यमान असते. हे साहित्य स्थूलमानाने जनमाणसाचे एक प्रतिबिंबच असते. अशा साहित्याने समाज स्वतःचे मनोरंजन करून घेत असतो. जीवनातील अनेक प्रश्नांची उकल अशा कथेत सापडते. धर्माधर्माचा आणि कर्माकर्माचा निर्णय घेण्यासाठी अशा कथांचा आधार घेतला जातो. त्यामुळे रसिक वृत्ती फुलते आणि एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित होतात. देशपरत्वे, कालपरत्वे आणि प्रसंगानूरूप लोककथा अनेक प्रवाहानी वाढते. लोकजीवन फुलविते आणि अनेक प्रवाहात स्वतःही विरते. वाढण्यासाठी पुन्हा पुनर्जन्म मिळावा म्हणून धर्माधर्मात आणि संप्रदायात अशा कथा आपले रंग भरतात. विशिष्ट पंथ अथवा धर्म यांच्या विचारांच्या प्रचारासाठी रूढ कथाप्रचारासाठी, रूढ कथांवर संस्कार घडतात. त्याप्रमाणे आपले इष्ट, तीर्थस्थळे, देवीदेवता यांची महती गाण्यासाठी अशा कथा मुद्दाम रचण्यात येतात. लोककथांच्या या विविध प्रवाहाचा वसा मराठी भाषेचे अगदी प्रारंभ काळापासून घेतला आहे. ज्या प्राकृत-अपभ्रंशातून मराठी भाषा विकसित झाली, त्या भाषेत बरेच समृद्ध कथा साहित्य होते. जैन साहित्याने व बौद्ध धर्मग्रंथ साहित्याने आपापल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी तत्वप्रधान साहित्यापेक्षा कथा साहित्याचा वापर केलेला दिसून येतो.

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 237-244

'कुवलयमाला' या ग्रंथातील कथा ही पहिली मराठी कथा मानली जाते. 'पंचतंत्र', 'हितोपदेश' यातून कथा आढळतात. आपल्या शिष्यांना उपदेश करणाऱ्या प्रसंगातून श्रीचक्रधर स्वामींनी दृष्टांतदाखल काही कथा सांगून उपदेश केला. रामायण-महाभारतातील कथांचा लोक जीवनावर फार मोठा परिणाम झाला होता. समाजाच्या सर्व स्तरात आणि देशाच्या सर्व प्रदेशात या कथा मुखोद्गत आहेत. कथेचा हा प्रवाह प्राचीन काळापासून सध्याच्या काळापर्यंत देखील अखंड चालू आहे. कथात्मक साहित्याला वेगवेगळ आकार पडत गेले,

**पटकथा संकल्पना-:**

कथेतूनच पटकथा आकारस येत असते. पटकथा लेखन किंवा स्क्रिप्ट रायटिंग ही पिक्चर फिल्म, टेलिव्हिजन, प्रोडक्शन किंवा व्हिडिओ गेम्स यासारख्या मास मिडियासाठी स्क्रिप्ट लिहिण्याची कला आणि हस्तकला आहे. हा सहसा फ्रीलान्स व्यवसाय असतो. चित्रपट, लघुपट, मालिका या सर्वांसाठी पटकथेची गरज असते. पटकथेविषयी विचारवंतानी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

चित्रपट समीक्षक सीड फील्ड(Syd Field ) म्हणतात, "A Screenplay is a story told with pictures and every picture tells a story"(१) पटकथा ही चित्राच्या माध्यमातून सांगितलेली गोष्ट असते. प्रत्येक चित्र एक गोष्ट सांगत असते. याचा अर्थ दृश्यप्रतिमा आणि शब्दप्रतिमा या परस्पर पूरक असतात. दृश्यप्रतिमांच्या मांडणीची सलगता ही कथेची वाहक असते. कथा ही दृश्यप्रतिमांच्या मांडणीतून आविष्कृत होत असते.

सुप्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित राय म्हणतात, "पटकथा ही चित्रपटाचा सांगाडा असते. दृश्य आणि ध्वनी यांच्या द्वारे पडद्यावर जे व्यक्त होते ते पटकथेचे खरे इंगित" (२)

Nash and Oke म्हणतात, "A Screenplay is a blueprint of a movie" (३)

डॉ.कविता मुरुमकर म्हणतात, "अर्थपूर्ण दृश्यांची संहिता म्हणजे चित्रपट होय. ही अर्थपूर्ण दृश्यांची संहिता जेव्हा लिखित स्वरुपात असते तेव्हा तिला पटकथा असे म्हणतात." (४)

यावरून पटकथा म्हणजे म्हणजे एखादा चित्रपट कसा दिसणार हे लिहून ठेवणे चित्रपट कसा दिसणार लिखित स्वरूप म्हणजे पटकथा लेखन होय. पटकथा म्हणजे एखादा चित्रपट किंवा मालिका कसा कशी दिसणार हे लिहिणे होय. चित्रपट,माहितीपट,लघुपट मालिका मास मिडीया वरील गेम्स या सर्वांच्या निर्मितीचा पाया असतो. असे आपल्याला ठामपणे म्हणता येते.पटकथा लेखनास फ्रीलान्स व्यवसाय मानला जातो. पटकथा लेखनासाठी निर्माते पटकथा लेखकाला भरपूर मोबदला देतात.

**पटकथेचे स्वरूप:-**

पटकथा हा एक अद्वितीय साहित्य प्रकार आहे. त्यामध्ये प्रेक्षकांच्या आनंदासाठी तयार उत्पादन म्हणून काम करण्याऐवजी इतर कलाकारांच्या कामगिरीच्या आधारे त्याचा अर्थ लावायचा असतो. रंगमंचाच्या दिशा निर्देशांचे वर्णन करताना तांत्रिक शब्दरचना आणि घटकातील गद्य वापरून पटकथा लिहिली जाते. कादंबरी किंवा लघुकथेच्या विपरीत पटकथा तिच्या पात्रांच्या अंतर्गत विचारांऐवजी कथेच्या शाब्दिक दृश्यपैलूंचे वर्णन करण्यावर लक्ष केंद्रित करते. पटकथा लेखनामध्ये सबटेक्स्ट कृती आणि प्रतिकात्मकतेद्वारे ते विचार आणि भावना जागृत करणे हे पटकथेचे उद्दिष्ट असते. पटकथेमध्ये दर्शविणे महत्त्वाचे असते. यात पात्रांच्या नावासमोर त्यांचा संवाद लिहिणे आवश्यक असते. जर दोन पात्रे एकाच वेळी बोलत असतील तर संवाद लिहिले जातात. पटकथेमध्ये पात्र प्रत्यक्षात नसून फोनवर किंवा मोबाईलवर बोलत असेल तर केवळ त्याचा आवाज येत असेल तर त्या पात्राचे नाव संवाद त्यासमोर व्हाईस ओव्हर लिहिणे गरजेचे असते. पात्र मोबाईलवर बोलत असेल तर ते दृश्यामध्ये प्रत्यक्ष दिसत असेल तर इन टू फोन असे पात्राच्या नावासमोर लिहावे. पात्र अदृश्य असेल तर ते कॅमेऱ्यात दिसत नसेल आवाज येत असेल तर ऑफ स्किन डायलॉग लिहावे. त्याच्यासमोर पात्राच्या प्रतिक्रिया लिहिल्या जातात. कॅरेक्टर पोझिशन लिहून त्यासमोर पात्रांच्या प्रतिक्रिया लिहिल्या जातात कॅमेरा पोझिशन लिहून त्यासमोर कॅमेरा कुठे कुठे शोध करेल उदा. कॅमेरा हॉलमधून किचन मध्ये वगैरे.

**पटकथेची वैशिष्ट्ये-:**

पटकथेच्या स्वरूपावरून पटकथेची काही वैशिष्टये आपल्याला दिसून येतात. यावरुन काही ठळक वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

* पटकथा हा एक साहित्य प्रकार आहे.
* पटकथा लेखन करणे ही एक हस्तकला आहे.
* पटकथा ही दृश्य आणि ध्वनी यांच्याद्वारे पडद्यावर व्यक्त होत असते.
* पटकथेच्या माध्यमातून लोकरंजनातून लोकशिक्षण होत असते.
* पटकथेवर लेखकाचा मोठा प्रभाव असतो.
* पटकथेत कथानकाचे अनेक मुद्दे असतात.
* पटकथा मास्टर स्क्रीन,स्क्रिप्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शैलीमध्ये लिहिल्या जातात.

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 237-244

**पटकथेचे घटक :-**

काही महत्वपूर्ण अशा घटकांच्या आधारे पटकथेची उभारणी होत असते. हे पटकथेचे घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. हे घटक संबंधित विषयाची ब्लू प्रिंट असते. पटकथेच्या संरचने या घटकांना महत्त्व असते. ते घटक पुढील प्रमाणे आहेत.

* दृश्य सातत्य
* कथानक
* स्वभाव रेखांकन
* संवाद
* प्रतिक

**दृश्य सातत्य:-**

पटकथेत चित्रित होणाऱ्या दृश्यांची सहाय्यता असते. पटकथा ही कथा बीजाचे दृश्य सातत्य असते. स्वतंत्र आणि अर्थपूर्ण असते अशा दृश्यांना समान धाग्यात जोडणे म्हणजेच दृश्य सातत्य होय. म्हणून पटकथेला दृश्यांची संरचना असे म्हणतात. प्रत्येक विषयाला संकल्पित अर्थ असतो. जो पुढील विषयांना अर्थ जोडणारा असतो. पटकथेतील प्रत्येक दृश्य ही एक स्वतंत्र कथाच असते. कथात्मक कथा आणि दृश्य यांची परस्परस पूरक सांगड म्हणजे पटकथा होय.

**कथानक:-**

पटकथेच्या आकृतीबंधात कथानकाला महत्त्व असते. पटकथेतील भाषा, प्रसंग, पात्रे, वातावरण, प्रतिक, संवाद यांच्या संयुक्तिकरणाच्या मूळाशी कथा बीज असते. शब्द प्रतिमेच्या चौकटीतील कथा दृश्य प्रतिमेत साकारते तेव्हा ती पटकथा होते. पटकथा ही चित्रपट, लघुपट, माहितीपट यांचा सांगाडा असते.

**स्वभाव रेखन:-**

पटकथेच्या कथा बिजाचा विकास करण्याचे व कथा बिजाला गतिमान करण्याचे कार्य स्वभाव रेखन करते. स्वभाव रेखानातून होणारे विविध भावनांचे आविष्कार संघर्ष कथानकाला विकसित करतात पटकथेच्या पात्रातील बाह्य संघर्ष आणि अंतर्गत संघर्ष दर्शविण्याचे कार्य विकसित करतात. पटकथेच्या पात्रातील बाह्य संघर्ष आणि अंतर्गत संघर्ष दर्शविण्याचे कार्य स्वभाव रेखांकन करते. अंतर्गत स्वभाव आणि बाह्य स्वभाव यांच्या आविष्कारातून पात्र उभे राहते. जिवनानुभवाला भिडण्याची ताकद स्वभाव रेखनात असते. त्यामुळे प्रेक्षक पटकथेशी एकरूप होतो.

**संवादः-**

संवाद हा कोणत्याही नाट्याचा प्राण असतो. कथात्मक निवेदन पद्धतीत संवाद महत्त्वाचे ठरतात. कारण स्वभाव लेखनासाठी संवादाचा उपयोग करून कथा बिजाला गतिमान करता येते. लघुपट, माहितीपट, चित्रपटात इतर वाङ्मय प्रकाराच्या तुलनेने संवादास दुय्यम स्थान असते. दुय्यम स्थान असले तरी संवादाचे महत्त्व टाळता येत नाही. कथा स्पष्ट करण्यासाठी आणि पात्रे स्पष्ट करण्यासाठी संवाद उपयोगी पडतात.

**प्रतिकः-**

पटकथेतील संवाद दृश्यत्मकतेला अनुरूप असतात. प्रतिक म्हणजे आपल्या इंद्रिय संवेदनांना सांकेतिक अर्थ देणारी वस्तू म्हणजे प्रतिक होय. पटकथेमध्ये कथा, पात्रे, संवाद यांना जसे महत्व असते, तसेच प्रतिकांनाही महत्त्व असते. पटकथेच्या दृश्य साहित्यात आशयाभिमुख काही चिन्हांकित दृश्य प्रतिमा वापरल्या जातात.

**पटकथेचे प्रकार-:**

पटकथेचे विविध प्रकार पडतात. ते पुढील प्रमाणे आहेत.

* गेम शोसाठी पटकथा लेखन
* व्हिडिओ गेम साठी पटकथा लेखन
* दूरदर्शन मालिकांसाठी पटकथादूरदर्शन मालिका रोजच्या मालिकांसाठी पटकथा लेखन
* चित्रपटासाठी पटकथा लेखन
* आयोग
* वैशिष्ट्य असाइनमेंट साठी पटकथा लेखन
* लघुपटासाठी पटकथा लेखन

**पटकथा लेखन अभ्यासक्रमासाठी शिक्षण देणाऱ्या संस्था :-**

पटकथा लिहिणे हे एक कौशल्य आहे. त्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. पटकथा लेखनाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. या संस्था पदवी आणि पदवी नसलेल्या अशा दोन्ही अभ्यासक्रम शाखेत प्रणालीत प्रशिक्षण देतात. त्यापैकी काही पुढील प्रमाणे आहेत.

* भारतीय विद्याभवन फिल्म टीव्ही अँड निमेशन स्टडीज, दिल्ली.
* भारतीय फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, पुणे

* महात्मा ज्योतिराव फुले युनिव्हर्सिटी, जयपुर/जबलपूर
* स्कूल ऑफ ब्रॉडकास्टिंग अँड कम्युनिकेशन, मुंबई
* दिल्ली स्कूल ऑफ कम्युनिकेशन, दिल्ली
* इन्स्टिट्यूट फॉर फिल्म स्क्रिप्ट रायटिंग, औरंगाबाद
* मुंबई फिल्म अकॅडमी, मुंबई
* रमेश सिप्पी अकॅडमी, मुंबई

**पटकथा लेखन व वर्तमानकालीन आव्हाने-:**

पटकथा लेखन हा अनेक चित्रपटांचा पाया असतो. पटकथेची पार्श्वभूमी पाहिली तर जॉर्ज मेलीस च्या १९०२ मध्ये आलेल्या 'अ ट्रिप टू द मून' या चित्रपटाची पटकथा ही पहिली पटकथा असल्याचे मानले जाते. चित्रपट मूक आहे परंतु पटकथेत अजूनही विशिष्ट वर्णने अनेक कृती रेषा आहेत. जी आधुनिक काळातील स्क्रिप्ट सारखी आहेत. जसजसा काळ पुढे सरकत गेला आणि चित्रपट दीर्घ आणि गुंतागुंतीची होत गेली, तसतशी पटकथेची गरज उद्योगात अधिक प्रकर्षाने जाणवू लागली. चित्रपटगृहांच्या परिचयाने पटकथेच्या विकासावरही परिणाम झाला. कारण प्रेक्षक अधिक व्यापक आणि अत्याधुनिक बनले. त्यामुळे कथाही तशा स्वरूपाच्या असण्याची गरज निर्माण झाली. १९२७ मध्ये पहिला नॉन सायलेंट चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर हॉलिवुड मध्ये पटकथा लेखन हे एक अत्यंत महत्त्वाचे स्थान बनले. १९३० च्या स्टुडिओ सिस्टिमने महत्त्व वाढवले. कारण स्टुडिओ प्रमुखांना उत्पादना क्षमता हवी होती. अशा प्रकारे चित्रपटाची 'ब्लू प्रिंट' म्हणजेच पटकथा असणे अगोदर अत्यंत इष्टतम ठरले. १९७० च्या सुमारास स्पेक्स स्क्रिप्ट प्रथम तयार केली गेली आणि लेखकांसाठी उद्योग कायमचा बदलला. भारतीय चित्रपट उद्योगात पटकथा लेखन हा एक महत्वपूर्ण मानले जाते. चित्रपटांसाठी पटकथा लेखन कठीण आणि स्पर्धात्मक मानले जाते.

**पटकथा संहिता लेखनाचा नमुना:-**

Slugline: आजच्या काळात लिहिता वाचता येणे आवश्यक आहे. अन्यथा अडचणीचा सामना करावा लागतो.

| Scene No. | Indoor/Outdoor | Location | Time | Day/Night |
|---|---|---|---|---|
| १ | आउटडोअर | बसस्थानक | १० वा. | सकाळ |

कथेतील स्त्री पात्राला आपल्या गावी जायचे आहे. म्हणून ती बसस्थानकावर आली आहे.

Character Name Dialogues

आजीबाई : (फलक वाचता येत नसल्यामुळे, कुणाला काही न विचारता,) एका बस मध्ये चढते. रिकाम्या सीटवर बसते. (थोड्या वेळात बस बसस्थानकातून निघते. काही अंतरावर वाहक आजीबाईला तिकिटासाठी विचारतो)

वाहक : आजी तिकीट घ्या.

आजी : अकोल्याचं अर्ध तिकीट द्या साहेब.

वाहक : आजी ही बस पुण्याला चालली, अकोला नाही जात.(ड्रायव्हरला बस थांबवण्यास सांगतो. बस थांबते.)

चालक : बसचं फलक वाचून बसायचे आजी.

आजी: सांग ओ माय किती झाली. मले वाचता-लिहिता येत नाई न बाप्पा.

वाहक :(बसचे दार उघडतो) आजी उतरा, बसस्थानकात परत जा. अकोला जाणारी बस कोणती? ते वाहकाला विचारा, मगच बस मध्ये बस जा.

आजी : हो जी साहेब.

(आजी बसस्थानकाच्या दिशेने निघून जाते )

**निष्कर्ष**

* साहित्य लेखनाचा आरंभ हा गद्य साहित्याने होत असतो.
* पटकथा लेखन करणे ही एक हस्तकला आहे.
* पटकथेची भाषा ही दृशात्मक असते.
* पटकथा हा चित्रपट, लघुपट, माहितीपट यांचा महत्त्वाचा घटक असतो.
* पटकथा आहे चित्रित होणाऱ्या दृश्यांची संहिता असते.
* कथा आणि दृश्य यांची परस्पर फरक सांगड म्हणजे पटकथा असते.
* पटाकथा लेखन आजच्या काळात हमखास उत्पन्न मिळवून देणारा एक उत्तम व्यवसाय म्हणून मान्यता पावला आहे.

## संदर्भ ग्रंथ

तौर पृथ्वीराज; ‘मराठी भाषिक कौशल्य विकास अथर्व पब्लिकेशन्स जळगाव जुलै २०१८ प्र.आ.पृ.क्र.४१

तत्रैव पृ. क्र. ४१

तत्रैव पृ. क्र. ४१

तत्रैव पृ. क्र. ४१

बऱ्हाटे काशिनाथ; मुरुमकर कविता; ‘पटकथा लेखन’ राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर / जबलपूर जुलै २०२४ प्र.आ.

कुळकर्णी श्रीधर रंगनाथ; ‘प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा’, सिंधू प्रकाशन. १९७०

www.google.com
Wikipedia

:::. Cite this article .:::

बावणे, प्रा. प्रकाश गंगाराम. & नागरे, डॉ. शिवाजी नीळकंठ. (2024). पटकथा : एक गद्य लेखनाचा प्रकार.

Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 237–244.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.48